MHBI060005222026

**फौजदारी किरकोळ अर्ज नं. ४५/२०२६**

**बाबासाहेब पंढरीनाथ दळवे**

**-वि.-**

**महाराष्ट्र शासन**

## निशाणी क्र.१ वर आदेश

प्रस्तुत अर्ज अर्जदाराने अंबाजोगाई पोलीस स्टेशन गु.र.नं. ७१/२०२६, प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे उल्लंघन ११(१)(ड), ११(१)(ई) प्रमाणे सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५(अ)(१), ५(अ)(२), ५(ब), ९, ११ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ११९ अन्वये दाखल असलेल्या गुन्हयात अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनमध्ये जप्त

| अनु. क्र. | वर्णन | किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | एक पांढ-या रंगाची खिल्लार गाय | ३०,०००/- |
| २) | एक पांढ-या रंगाची गाय | ४५,०००/- |
| ३) | एक पांढ-या रंगाची गाय | ३५,०००/- |
| ४) | एक काळया रंगाची व पोटाला पांढरे रंगाचे चट्टे असलेली गाय | ४५,०००/- |
| ५) | एक काळया रंगाची व पोटाला पांढरे रंगाचे चट्टे असलेली गाय | ५०,०००/- |
| ६) | एक काळया रंगाची व पोटाला पांढरे रंगाचे चट्टे असलेली गाय | ५५,०००/- |
| ७) | एक काळया रंगाची व पोटाला पांढरे रंगाचे चट्टे असलेली गाय | ३०,०००/- |
| ८) | एक काळया रंगाची व डोक्याल पांढरे रंगाचे चट्टे असलेली गाय | ४०,०००/- |
| | एकुण ०८ जनावरे | ३,३०,०००/- |

हे तात्पुरत्या स्वरुपात परत करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या खुलाशात सादर केले आहे की, सदर गोवंश हे चारापाणी न टाकला एका ठिकाणी मिळुन आलेले आहेतव सदर गोवंश हे जर अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास अर्जदार हा पुन्हा सदर गोवंशास पाणी व चारा न टाकता तसेच उपाशी ठेऊ शकतो तसे सदर गोवंश हे जर अर्जदारास दिल्यास सदर गोवंशची कत्तल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. तपासी अधिकारी यांनी त्यांच्या खुलाशात सादर केले आहे की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी हनुमंत देवबा चादर यांना दिनांक २१/०२/२०२६ रोजी पोलीस स्टेशनला हजर असताना पोलीस निरीक्षक जोगदंड यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, अंबाजोगाई येथील अरीश कॉलनी, मंडी बाजार अंबाजोगाई येथील पत्राचे शेडमध्ये इसम नामे मोबीन ईस्माईल खुरेशी याने कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे आणली आहेत व त्यांची कत्तल करणार आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक यांनी फिर्यादी व सहायक पोलीस निरीक्षक ससाणे, पोलीस हवालदार/१६७१ गायकवाड, पोलीस हवालदार/१६११ गाडे, पोलीस अंमलदार/२०२० नागरगोजे, पोलीस अंमलदार/१५० राठोड असे सोबत दोन पंचाना घेऊन १८.२५ वाता छापा मारला असता, छापा पार्टीस पाहुन एक इसम हा पहफन गेला. त्याच्या नावाची माहिती घेता तो मोबीन ईस्माईल खुरेशी हा असल्याची माहिती मिळाली. सदर ठिकाणी पत्राचे शेडमध्ये गोवंशीय खालीप्रमाणे एकुण ८ जनावरे कत्तलीसाठी आणुन बांधल्याचे दिसुन आले.

| अनु. क्र. | वर्णन | किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | एक पांढ-या रंगाची खिल्लार गाय | ३०,०००/- |
| २) | एक पांढ-या रंगाची गाय | ४५,०००/- |
| ३) | एक पांढ-या रंगाची गाय | ३५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ४) | एक काळया रंगाची व पोटाला पांढरे रंगाचे चट्टे असलेली गाय | ४५,०००/- |
| ५) | एक काळया रंगाची व पोटाला पांढरे रंगाचे चट्टे असलेली गाय | ५०,०००/- |
| ६) | एक काळया रंगाची व पोटाला पांढरे रंगाचे चट्टे असलेली गाय | ५५,०००/- |
| ७) | एक काळया रंगाची व पोटाला पांढरे रंगाचे चट्टे असलेली गाय | ३०,०००/- |
| ८) | एक काळया रंगाची व डोक्याल पांढरे रंगाचे चट्टे असलेली गाय | ४०,०००/- |

४. सबब वरील गोवंशीय जनावरे ही लोकनेते गोपीनाथ मुंडे गोशाळा वरवटी, ता. अंबाजोगाई, जि. बीड या गोशाळेमध्ये जमा करण्यत आलेली आहेत. तरी पुढील योग्य तो आदेश होण्यास विनंती असे लेखी म्हणणे सादर केले आहे.

५. प्रस्तुत प्रकरणात नि.क्र. १ वरील आदेशान्वये गोशाळेचे देखील लेखी म्हणणे मागवण्यात आले. सदर गोशाळेने त्यांच्या नि.क्र. १४ वरील लेखी म्हणण्यात असे कथन केले आहे की, श्रीसंत भगवान बाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थांतर्गत लोकनेते गोपीनाथ मुंडे गोरक्षण शाळा वरवटी, ता. अंबाजोगाई, जि. बीड ही नोंदणीकृत गोशाळा आहे. उपरोक्त नमुद ८ जनावरे ही कत्तल करण्यासाठी बांधण्यात आली होती. अशा परिस्थीतीत पोलीसांनी सदरची जनावरे ताब्यात घेऊन जनावरांच्या योग्य प्रतीच्या पालनपोषणासाठी त्यांचे गोशाळेमध्ये ठेवण्यात आलेले आहेत. अर्जदार हा सदर जनावरांचा मालक आहे ही गोष्ट गोशाळेने नाकारलेली आहे. गोशाळेतर्फे अर्जदाराने दाखल केलेल्या खरेदीविक्रीच्या पावत्या या बोगस असल्याचे कथन केलेले आहे. अर्जदाराने सदर जनावरांना लसीकरण केलयाचे तसेच पशु वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र दाखल केले नाही. अर्जदाराने प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० व त्यातील नियम २०१७ अंतर्गत विविध तरतुदींचा

उहापोह त्यांच्या कथनात केलेल आहे. तसेच गोशाळेच्या कथनामध्ये मा. ना. सर्वोच्च न्यायालय व मा. ना. उच्च न्यायालयाच्या विविध न्यायनिर्णयाचा देखील ऊहापोह केलेला आहे. प्रस्तुत गोशाळेने जनावरांच्या खर्चापोटी प्रति जनावर रक्कम रु. २००/- खर्चापोटी देण्याचा आदेश देण्याचेदेखील कथन केलेले आहे. शेवटी सदर गोशाळेतर्फे अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. गोशाळेतर्फे विधीज्ञांनी त्यांच्या लेखी कथनामध्ये महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाच्या दिनांक २७/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे जनावरांची खरेदी विक्री करण्यापुर्वी त्यांना इअर टॅगींगशिवाय खरेदी विक्री करता येणार नसल्याबाबतचा शासन निर्णय दाखल केला आहे. त्यावरुन ग्रामपंचायत नेकनुर यांचे लेखी म्हणणे मागवण्यात आले. ग्रामपंचायत नेकनुर यांच्यातर्फे नि.क्र. १७ अन्वये लेखी म्हणणे दाखल करण्यात आले. त्यामध्ये अर्जदाराने दाखल केलेल्या खरेदीविक्रीच्या पावत्या हया ग्रामपंचायतीने दाखल केल्याचे नमुद केले आहे. तसेच इअर टॅगींग केले नसल्याचे देखील कथन केले आहे. सदर लेखी म्हणण्यावर ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय नेकनुर यांचे पद नमुद केले असले तरी त्यावर असलेली सही ही ग्रामविकास अधिकारी यांची नसल्याचे कथन करण्यात आल्याने नि.क्र. २० अन्वये ग्रामविकास अधिकारी, नेकनुर यांनी त्यांचे म्हणणे दाखल करणेकामी मुदत मागितली. मुदत देऊनही ग्रामविकास अधिकारी नेकनुर यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. गोशाळेमार्फत नि.क्र. २२ सोबत ग्रामविकास अधिकारी यांनी वसुली लिपीक यांना खरेदीविक्री संदर्भात दाखले देण्याबाबतचे अधिकार दिल्याचे पत्र दाखल केले आहे.

७. प्रस्तुत गुन्हयातील आरोपी मोबीन ईस्माईल खुरेशी याने नि.क्र. १३ अन्वये त्याचे लेखी कथन दाखल करुन अर्जदार याने उपरोक्त नमुद जनावरे ही सांभाळ, खरेदी, विक्री, दुग्ध व्यवसाय व शेती पुरक व्यवसायासाठी खरेदी केल्याचे सपष्टपणे कथन केले आहे. तसेच अर्जदार व प्रस्तुत आरोपीमध्ये ब-याच वर्षापासुन

संबंध असल्यामुळे प्रस्तुत अर्जदार हा आरोपीच्या पत्राचे शेडमध्ये चारापाणी व बांधण्याची व्यवस्थीतरित्या सोय असल्यामुळे अर्जदार हा आरोपीच्या शेडमध्ये जनावरे बांधत असल्याचे मान्य व कबुल केले आहे व केवळ रमजान महिन्यामध्ये सदरची जनावरे ही आरोपी हा मुस्लीम असल्यामुळे केवळ संशयावरुन जप्त केले असल्याचे कथन केले आहे.

८. अर्जाच्या पृष्ठयर्थ अर्जदाराने ग्रामपंचायत कार्यालय, नेकनुर, ता. व जि. बीड यांचे जनावर विक्री व परिवर्तन दाखल्याच्या पावत्या व अर्जदाराचे आधारकार्ड दाखल केले आहे.

९. प्रस्तुत गुन्हयातील प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये उपरोक्त नमुद जनावरे ही आरोपी मोबीन खुरेशी याने कुठुनतरी कत्तलीसाठी कत्तलखाण्यामध्ये आणुन बांधुन जिवंत गायींना चारापाणी न टाकता त्यांना निर्दयीपणे व क्रुरतेची वागणुक दिली या कारणास्तव जप्त केली आहेत. तपासी अधिकारी यांनी प्रस्तुत अर्जावरील त्यांच्या लेखी खुलास्यामधे आरोपी व अर्जदार यांनी गोवंशबाबत काहीही कागदपत्रे दाखल केली नसल्यामुळे गोवंशची कत्तल होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे कथन केलेले आहे. तसेच गोशाळेतर्फे केलेल्या युक्तीवादामध्ये सदरच्या पावत्या या खोटया असल्याचे कथन केलेले आहे.अर्जदार याने प्रस्तुत अर्जासोबत नेकनुर ग्रामपंचायत कार्यालय नेकनुर यांच्या दिनांक २१/०२/२०२६ रोजीच्या पावती क्र. १९०४ ते १९११ या दाखल केलेल्या आहेत. तसेच नि.क्र. १७ अन्वये नेकनुर ग्रामपंचायत यांच्यातर्फे दाखल केलेल्या खुलास्यामध्ये देखील अर्जदार यांनी सदर पावत्या आधारे उपरोक्त नमुद जनावरे ही खरेदी केली असल्याचे कथन केलेले आहे. यावरुन अर्जदार हा उपरोक्त नमुद जनावरांचा मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे अर्जदाराने दाखल केलेल्या पावत्या या ख–या आहेत किंवा खोटया आहेत हे प्रस्तुत प्रकरणाच्या दरम्यान सिध्द होऊ शकते. परंतु आजमितीला प्रथमदर्शनी अर्जदार हाच सदर जनावरांचा मालक

असल्याचे दिसते. तसेच प्रस्तुत प्रकरणातील आरोपी मोबीन खुरेशी याने देखील त्याच्या नि.क्र. १३ वरील लेख खुलास्यामध्ये जनावरे ही अर्जदार यांच्या ताब्यात देण्यास त्याची कसलीही हरकत नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच अर्जदार यांचेव्यतिरीक्त सदर जनावरांची मालकी अथवा ताबा मागितलेला नाही. तपासी अधिकारी यांच्या दाखल खुलास्यामध्ये केवळ कागदपत्रांअभावी संशयाखातर सदर जनावरे ताब्यात घेतले असल्याचे कथन केलेले आहे. तसेच प्रथम खबरी अहवालामध्ये नमुद जनावरे ही कत्तलीसाठी बांधली असल्याचे कथन केले आहे. परंतु अर्जदार याने प्रथमदर्शनी तो उपरोक्त नमुद जनावरांचा मालक असल्याचे अभिलेखावर आणलेले आहे.

१०. प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतिबंध (सांभाळ आणि खर्च) नियम २०१७ चे नियम ३(ब) अन्वये जप्त गोवंश जनावरे यांचा ताबा खटल्याचा निकाल लागेपावेतो पांझरपोळ व इतर संस्थांना देता येईल बाबत तरतुद आहे.

११. नियम ४ अन्वये खटल्याचा निकाल लागेपावेतो जप्त जनावरांच्या देखभालीकरिता आवश्यक असलेला खर्चाबाबत न्यायदंडाधिकारी आदेश करु शकतात अशी तरतुद नमुद आहे.

१२. नियम ५ (१) अन्वये न्यायदंडाधिकारी हे आरोपी आणि जनावरांचे मालक यांचेकडून जनावरांच्या वाहतुक, देखभाल आणि वैद्यकीय खर्चाकरिता खर्च वसूल करण्याकरिता बंधपत्र घेतील.

१३. तसेच, नियम ५(४) अन्वये गुन्हयात वापरलेले वाहन सुरक्षेच्या स्वरुपात ठेवले पाहिजे अशी तरतूद आहे.

१४. नियम ५(५) अन्वये प्राणी वाहून नेणेबाबत आरोप असल्यास वाहन मालक हा जनावरांची वाहतूक, उपचार आणि सांभाळ करिता होणाऱ्या खर्चास स्वतंत्र आणि वैयक्तीकरित्या जबाबदार राहतील अशी तरतूद नमूद आहे.

गोशाळेतर्फे विविध कायद्यांमधील तरतुदींचा तसेच मा.ना. सर्वोच्च न्यायालय व मा. ना. उच्च् न्यायालयांच्या न्यायनिवाडयांचा ऊहापोह असलेला अहवला अनु.क्र. १ ते १६३ अन्वये दाखल केलेला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता, सदर अहवालामध्ये जनावरांच्या मुळ मालकास खटला चालु असताना जनावरांचा तात्पुरता ताबा देता येणार नाही याबाबत काहीही नमुद नाही. तसेच सदर जनावरे मुळ मालकाच्या काही अटी व शर्थीअन्वये ताब्यात दिल्यास प्रस्तुत गोशाळेवर देखील कोणताही अन्याय होणार नाही.

१५. फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ४५७ चे अवलोकन केले असता जेव्हा जेव्हा कोणताही पोलीस अधिकारी यांनी संपत्तीचे अधिग्रहण केल्याचे वृत्त या संहितेच्या उपबंधाखाली दंडाधिकारी यांना कळविण्यात आले असेल व चौकशी किंवा संपरिक्षेत अशी संपत्ती फौजदारी न्यायालयात आणली गेली नसेल तेव्हा अशा संपत्तीची विल्हेवाट करणे किंवा तिच्या कब्जास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे तिची सपुर्दगी करणे याबाबत दंडाधिकारी आदेश देवू शकतील.

१६. सदर कलम ४५७ अन्वये अधिग्रहीत केलेली संपत्तीचा कब्जा देत असतांना त्या संपत्तीचा हक्क्दार म्हणजेचे मालकाबाबत चौकशी करणे आवश्यक आहे. कलम ४५७ मध्ये अधिग्रहीत संपत्ती ही ज्याच्या ताब्यातुन चोरी झाली त्यास संपत्ती परत करावी याबाबत कुठलीही वाच्यता करीत नसून संपत्ती ही मालकास दयावी असे नमुद केलेले आहे. त्याप्रमाणे अर्जदाराने नमुद केलेली जप्त जनावरे हे त्याच्या मालकीची असल्याचे दाखल कागदपत्रावरुन स्पष्ट होत आहे. अशा परिस्थितीती जप्त जनावरे हे अर्जदारास देणे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ४५७ अन्वये योग्य होईल. असे असले तरी खटल्याच्या सुनावणीदरम्यान सदर जनावरांची आवश्यक्ता पडू शकते. त्यामुळे, खालील अटी व शर्तीवर अर्जदारास सदर जनावरांचा तात्पुरता ताबा मालक या नात्याने अर्जदारास देणे योग्य होईल. करिता, खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येत आहे.

अ- अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन गुरनं. ७१/२०२६ मधील उपरोक्त नमुद ०८ जनावरे हे अर्जदार बाबासाहेब उर्फ बाबुराव पंढरीनाथ दळवे यांच्या ताब्यात रुपये ३,५०,०००/-च्या सुपुर्तनाम्यावर देण्यात यावे.

ब- अर्जदार यांनी जप्त जनावरांचा अंतरीम ताबा मिळाल्यानंतर सदर जनावरांना हानी अथवा ईजा होईल अथवा त्यांच्या जिवीतास धोका होईल असे कुठलेही कृत्य करु नये. तसेच सदर जनावरांची विक्री, कत्तल करणार नाही, तसेच तारण ठेवणार नाही, तसेच तपासी अधिकारी अथवा न्यायालयाने आदेशित केल्यास स्वत: हजर राहण्याचे व जनावरे हजर करण्याचे व तपासकामी अथवा खटल्याच्या सुनावणीदरम्यान मदत करेन असे बंधपत्र अर्जदाराने पोलीस तपासी अधिकारी यांचेकडे सादर करावे.

क- अर्जदाराने प्रस्तुत जनावरे ताब्यात मिळाल्यानंतर त्यांना योग्य ती वैद्यकीय सेवा, अन्न व निवारा देऊन सदर जनावरांचा प्रस्तुत खटल्याचा अंतिम निकाल लागेपावेतो योग्य प्रकारे पालनपोषण करावे. तसेच दोषारोपपत्र दाखल होईपावेतो तपासी अधिकारी यांनी निर्देशीत केल्यास त्यांच्याकडे व त्यानंतर न्यायालय निर्देशीत करील त्यावेळी जप्त जनावरांची शारीरीक स्थीती दाखवण्यासाठी शासकीय पशु वैद्यकीय अधिका-यांचा अहवाल दाखल करावा.

२. अर्जदार यांनी प्रस्तुत जप्त जनावरांचा तपासी अधिकारी यांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे गोरक्षण शाळा, वरवटी, ता. अंबाजोगाई, जि. बीड यांना ताबा दिल्याचे तारखेपासुन ते जनावरे अंतरीम ताब्यात मिळेपावेतोच्या

कालावधीचा नियमाप्रमाणे प्रती जनावर रु. २००/- प्रतिदिन प्रमाणे खर्च द्यावा व सदर रक्कमेची पावतीची प्रमाणीत प्रत तपासी अधिकारी यांना सादर करावी.

३. तपासी अधिकारी यांना आदेश देण्यात येतो की, सदर जप्त जनावरांचा योग्य तो पंचनामा करुन घ्यावा. सदर जनावरांचे छायाचित्र काढून त्यावर अर्जदाराच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

४. अर्जदाराने पंचनाम्यासाठी आवश्यक असणाऱ्या छायाचित्रांचा खर्च करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SAGADE PRAVIN PRABHAKAR
Date: 2026.04.27 17:25:31 +0530

अंबाजोगाई
दिनांक: २७/०४/२०२६

**(प्रविण प्र. सागडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट नं.१)अंबाजोगाई, जि. बीड.

<table>
<tr><td colspan="3" align="center">:: <u>Certificate of Stenographer</u> ::</td></tr>
<tr><td colspan="3" align="center">“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order.”</td></tr>
<tr><td align="right">Dictated On :</td><td>27/04/2026.</td><td rowspan="4" align="center">Digitally signed by AKASH BASAVRAJ KABNE<br>Date: 2026.04.27 17:26:53 +0530<br>( Akash Kabne )<br>Stenographer Grade – 3<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Ambajogai.</td></tr>
<tr><td align="right">Transcribed On :</td><td>27/04/2026.</td></tr>
<tr><td align="right">Checked & Signed On :</td><td>27/04/2026.</td></tr>
<tr><td align="right">Date :<br>Place : Ambajogai.</td><td>27/03/2026.</td></tr>
</table>